# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ११/१०/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

### अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत मौजा चनकापुर येथे दिनांक १०/१०/२०१९ चे १६:४५ वा. ते १७:१५ वा. दरम्यान आरोपी नामे— आकाश हिरामन धुवे, वय २५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, चनकापुर हा हातामध्ये लोखंडी मुठेचे व पात्याचे तलवार धारा ३७ (१) (३) मपोका उल्लंघन करतांना मिळुन आल्याने हातात घेउन फिरतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलिस शिपाई पंकज सहारे, पो.स्टे. खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुर्यभान जळते हे करीत आहेत.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. खापा :— अंतर्गत सुरेवानी येथे दिनांक ०७/१०/२०२२ चे २०.०० वा. दरम्यान **दुर्वाश रमेश ईरपाची (मृतक), वय ३० वर्ष, रा. सुरेवानी** याचा पत्नी सोबत वादविवाद झाल्याने त्याने स्वताचे घरी विषारी औषध प्राषण केले. त्याची प्रकृती बिघडल्याने त्यास उपचाराकामी मेयो हॉस्पीटल नागपुर येथे भर्ती केले असता उपचारा दरम्यान दि ०७/१०/२०२२ चे ०२.४५ वा. डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. मेयो हॉस्पीटल नागपुर येथुन मर्ग संबधीत कागदपत्रे पो.स्टे. खापा येथे प्राप्त झाल्याने सदर मर्ग दाखल करून चौकशीत घेतला.

सदर प्रकरणी पोहवा प्रदीप ठाकुर मेयो पोलीस बुथ यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार प्रमोद बन्सोड मो.नं.९९२३४१०२२३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर